# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ३३३-२२** **दिनांक ०७/११/२०२२**

## ऑनलाईन एस्कॉर्ट सर्व्हिसेसच्या माध्यमातुन वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या इसमांवर कारवाई करुन ०१ पिडित मुलीची सुटका- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर पथकास यश.

दि.०५.११.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कांदरपाडा, दहिसर पुर्व येथे राहणारा इसम नामे विकी उर्फ विजय यादव व त्याचा साथीदार राहुल उर्फ अलोक रवानी हे इंटनेटवर दिसणाऱ्या जाहिरातीव्दारे व मोबाईलवर गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, तो वेश्याव्यवसायासाठी मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये रुम बुक करुन किंवा गिऱ्हाईकास लॉजमध्ये रुम बुक करावयास लावून किंवा गिऱ्हाईकाचे सोयीनुसार वेश्यागमनाकरीता मुली पुरवितो.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोनि समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन विकी उर्फ विजय यादव यांचे सांगणेवरुन ॲटो रिक्षा चालक सुरेश यादव हा हॉटेल पार्क व्हु, फॅमिली रेस्टॉरंट आणि बारसमोर रस्त्यावर, श्री. लक्ष्मी पार्क, कनकिया रोड, गॅलक्सी हॉस्पीटलजवळ, मिरारोड पुर्व या ठिकाणी पुरुष गिऱ्हाईकास मुलीला पुरविण्यासाठी आल्याने बोगस गिऱ्हाईक व पंच यांना नमुद ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दि.०५.११.२०२२ रोजी १६.५० वा. छापा कारवाई केली असता ॲटो रिक्षा चालक सुरेश रामनरेश यादव हा त्याचे ॲटो रिक्षा क्र. MH-02-DK-9252 मधुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात पैसे स्विकारुन पुरुष गिऱ्हाईकास मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याकडे चौकशी अंती त्याचा साथीदार हा रविकुमार उर्फ छोटु इंदो राम, वय-२३ वर्ष, यास एस.डि. थॉमस स्कुलच्या जवळ असलेली चाळीच्या पहिल्या माळयावर, कांदरपाडा, नयागाव, दहिसर प., मुंबई येथुन ताब्यात घेवुन वेश्यागमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०१ पिडित महिलेची सुटका करण्यात आली. सदर बाबत अटक आरोपी व पाहिजे आरोपी विकी उर्फ विजय यादव व राहुल उर्फ अलोक रवानी यांच्याविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ४६३ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ दि.०६.११.२०२२ रोजी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप.आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, स.पो.नि. उमेश पाटील, रामचंद्र पाटील, पो.शि. केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, म.स.ु.ब. किरण मोरे सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर व म.पो.हवा. यादव नेमणुक मनुष्यवध तपास पथक यांनी केली आहे.

-------oooo-------